# येई हो विट्ठले

Yei Ho Vitthale — Come, Vitthal · Sant Namdev

> येई हो विट्ठले माझे माऊली ये ।
> निढळावरी कर ठेवुनी वाट मी पाहे ॥ धृ ॥

आलिया गेलिया हातीं धाडी निरोप ।
पंढरपुरीं आहे माझा मायबाप ॥१ ॥

पिवळा पीतांबर कैसा गगनीं झळकला ।
गरुडावर बैसुनी माझा कैवारी आला ॥२ ॥

विठोबाचें राज्य आम्हां नित्य दिपवाळी ।
विष्णुदास नामा जीवें भावें ओवाळी ॥३ ॥